**प्रतिवादी ९—ब तर्फे सा.क्र. २ यांना शपथ देण्यात आली.**

**प्रतिवादी ९—ब तर्फे साक्षीदार क्र. २ चा उलटतपास प्रतिवादी क्र.१५ तर्फे वकील श्री. एस.ए.रोकडे यांचे तर्फे शपथेवर सुरू.**

वादी तर्फे सदरहू साक्षीदाराचा उलटतपास प्रतिवादी क्र. १५ यांना घेता येणार नाही असा आक्षेप नोंदविला.

प्रस्तुत साक्षीदार हा हक्कसोड पत्रावरील असून परंतू हक्कसोड पत्रावर त्याची सही नसल्याने त्याबाबत उलटतपास घेण्याचा प्रतिवादी क्र. १५ यांना हक्क असल्याने वादीचा आक्षेप फेटाळण्यात येत आहे.

दावा मिळकत गट नं.२१२ च्या चतु:सिमा मी सांगू शकतो. पुर्वेस घाडगे, पश्चिमेस घाडगे, दक्षिणेस रस्ता व उत्तरेस ओढा आहे. मी जन्मापासुन मौजे झरे येथे राहत आहे. प्रस्तुत मिळकतीचे मुळ मालक हे रंगनाथ कुलकर्णी हे होते. त्यांच्या मृत्यु पश्चात मुलगा, मुलगी व पत्नी हे वारस आहेत. परंतू ते झरे येथे राहत नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, गट नं. २१२ ही मिळकत कुळकायदाची आहे. प्रतिवादी क्र. ९—ब हा माझे चुलत भावाचा मुलगा आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट नं. २१२ या मिळकतीस लक्ष्मण बोराटे हे कुळ आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट नं. २१२ ही लक्ष्मण बोराटे हे वहिवाटत आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट नं. २१२ ची इसार पावती प्रभाकर कुलकर्णी व विश्वंभर कुलकर्णी यांनी वादी व प्रतिवादी यांनी करून दिले नसल्याने हक्कसोड पत्र करण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत मिळकती संदर्भात झालेल्या व्यवहाराबाबत तसेच दाव्याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर इसार पावतीचा व्यवहार माझे समक्ष झाला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सागर कुलकर्णी यांचे सांगण्यावरून पुराव्याचे खोटे शपथपत्र दाखल केले व आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**प्रतिवादी ९—ब तर्फे सा.क्र.२ चा उलटतपास वादी तर्फे वकील श्री. डी.आर.देसाई यांचे तर्फे सुरु**

पशु संवर्धन खात्यामध्ये मी नोकरीस होतो. हे म्हणणे खरे आहे की, रावसाहेब कुलकर्णी व बन्सी घाडगे यांनी दावा मिळकतीचा प्रभाकर व विश्वंभर कुलकर्णी यांचेकडून खरेदी करण्याकरिता साठेखताचा दस्त दि. २४.०७.१९८७ रोजी करून घेतला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदरची जमिन रक्कम रू. २,५०,०००/— ला घेण्याचे ठरले व त्या पोटी रक्कम रू. ५०,०००/— प्रस्तुत दिवशी देण्यात आले व त्याच दिवशी रावसाहेब कुलकर्णी व बन्सी घाडगे यांना ताबा देण्यात आला. तसेच त्यांनी सदर साठेखतावर सहया देखील केलेल्या होत्या.

दि. १६.०४.१९९८ रोजी मी माझे गावी मौजे झरे येथे होतो. रावसाहेब कुलकर्णी हे इंग्रजी मध्ये सहया करत असलेबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, करारपत्र निशाण २९६ चा स्टॅम्प हा रावसाहेब कुलकर्णी यांनी खरेदी केला होता. आता मला सदर स्टॅम्प दाखविला त्यावरील सही रावसाहेब कुलकर्णी यांची नाही. रावसाहेब कुलकर्णी यांचा मुख्ख व्यवसाय हा भिक्षुकी हा होता व त्यावर त्यांचा

उदरनिर्वाह चाल असे. हे म्हणणे खरे नाही की, रावसाहेब कुलकर्णी यांची आर्थिक परिस्थिती हलाकीची होती. त्याबाबत माझेकडे कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, रावसाहेब कुलकर्णी यांची आर्थिक परिस्थिती हलाकीची असल्याने प्रस्तुत जमिन खरेदी करण्यापासुन माघार घेतली. हे म्हणणे खरे नाही की, रावसाहेब कुलकर्णी यांनी साठेखतापोटी दिलेली रक्कम २५,०००/— रूपये बन्सी घाडगे यांचेकडून परत घेतली व खरेदी करण्याचा हक्क सोडला. हे म्हणणे खरे नाही की, त्यापोटी रावसाहेब कुलकर्णी यांनी करारपत्राचा दस्त साक्षीदार बाळु कानगुडे व मोहन बोराटे यांच्या समक्ष लिहून दिला व सदर दस्तावर रावसाहेब कुलकर्णी यांनी सही केली. हे म्हणणे खरे नाही की, करारपत्र निशाण क्र. २९६ चा दस्त हा माझे समक्ष झाला हे मी खोटे सांगत आहे.

बन्सी घाडगे यांनी रावसाहेब कुलकर्णी यांना तुझे नाव झरे येथील रेशन दुकानास लावून देतो असे म्हणून सहया घेतल्या हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, रेशन दुकानाला नाव लावण्याकरिता महसुल खात्याची परवानगी लागते. रावसाहेब कुलकर्णी यांनी रेशन दुकानाला नाव लावण्याकरिता महसुल खात्याकडे अर्ज केल्या बाबत मला माहिती आहे. सदर अर्जाची तारीख, वार व महिना सांगू शकत नाही. प्रस्तुतचा बनावट दस्त केल्याबाबत रावसाहेब कुलकर्णी यांनी तसेच मी स्वत: बन्सी घाडगे यांच्या विरोधात फौजदारी केस दाखल केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे प्रतिज्ञापत्रातील मजकुराबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सागर कुलकर्णी यांचे सांगण्यावरून पुराव्याचे खोटे शपथपत्र दाखल केले व आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण,
फेरतपास नाही,

श्रवणोत्तर स्विकृत्त

(एम.पी.एखे)

दि.०२.०३.२०२४ दिवाणी न्यायाधीश व.स्तर, करमाळा